6 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवराजधानी रायगड परिक्रमा' उत्साहात

## शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवराजधानीची रायगड परिक्रमा' हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत ४० मुले व मुली तसेच २० अधिकारी, कर्मचारी आणि मुंबई विद्यापीठांतर्गत ४० मुले व मुली तसेच २० अधिकारी, कर्मचारी अशा १२० जणांनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमाला शनिवारी रायगड पायथ्यापासून सुरुवात होवून एक दिवस रायगडावर मुक्काम करण्यात आला. रविवारी हिरकणी बुरुजामार्गे रायगड पायथ्यापर्यंत पायी चालत समारोप करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून सहभागी शिबिरार्थींना इतिहासाची प्रत्यक्ष माहिती, दऱ्या खोऱ्यातील आपत्कालीन परिस्थिती नियंत्रण यांसह शाहिरी पोवाडा कार्यक्रमाच्या माध्यमातून उद्बोधन करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड त्याचबरोबर, मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.सुनिल पाटील, वित्त व लेखाधिकारी विजय तायडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. बी. एस. बिंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुजित मुंढे, सुरेश मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**शिबिरार्थींनी घेतला जाज्वल्य इतिहासाचा अनुभव**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शिवराजधानी रायगड परिक्रमा' या उपक्रमात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासोबत सहभागी विद्यार्थी.

6 MAR 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ माध्यम समूह व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने

सकाळ उदय भविष्यपत्राचा

Fizzinga
SANJAY GHODAWAT GROUP

साम

YOUNG INSPIRATORS NETWORK

प्रस्तुत

# संवाद ध्येयवेड्यांशी
# ऊर्जा 2018

**आज ६ मार्च २०१८**
वेळ: सायं. ६ ते ८
स्थळ : लोककला केंद्र, शिवाजी विद्यापीठ (पदवीदान सभागृह), कोल्हापूर.

ज्यांचे जीवन, विचार, कार्य प्रेरक आहेत.. अशा यशस्वी ध्येयवेड्यांना भेटण्याची संधी!



## संदीप पाटील

कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक, सातारा

गडचिरोलीच्या नक्षलवादी परिसरात कर्तव्य बजावताना आव्हानांशी लढणारा निस्सिम कर्तव्यदक्ष अधिकारी. नक्षलवाद्यांची शरणागती-पुर्नवसन या क्षेत्रात भरीव व लक्षणीय यश. अनेक पुरस्कारांनी सन्मानित असणाऱ्या या अधिकाऱ्याशी संवाद म्हणजे थरारक, माहितीपूर्ण व अभिमानास्पद अनुभव.

## अमोल यादव

पायलट व विमान निर्मितीमधील मराठी कर्तृत्व

'मेक इन इंडिया' स्वप्न साकारणारा ध्येयवेडा. घरच्या गच्चीवरच विमान निर्मिती करण्यासाठी सतरा वर्षे धडपडणारा युवक. 'अमोल' कर्तृत्वाची झेप घेताना, जमिनीवर पाय असणारा कुशल, देशप्रेमी संशोधक.



**मुलाखतकार : मिलींद कुलकर्णी, पुणे**

Co Sponsor

Chate The Symbol Of Merit
MARVELOUS ENGINEERS PVT. LTD
TANISHQ
ASHOKRAO MANE GROUP OF INSTITUTIONS
श्री ट्रॅव्हल्स

Hospitality Partner
SAYAJI Yours. Truly.

Radio Partner
RAG RAG MEIN KOLHAPUR CITY
Radio City

**प्रवेश विनामुल्य**

- 6 MAR 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बदलांकडे सकारात्मकतेने पाहिल्यास करिअरच्या संधींची जाणीव : लोखंडे

कोल्हापूर : प्रतिनिधी

आपल्या आसपासच्या बदलांकडे सकारात्मकतेने पाहिल्यास नोकरी-व्यवसायांच्या संधींची जाणीव होईल, असे प्रतिपादन पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल काऊन्सेलिंग यांच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात लोखंडे बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या. अध्यक्षस्थानी वाणिज्य अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव होते.

लोखंडे म्हणाले, भारतामध्ये सकारात्मक बदलांसाठी मोठी ताकद आहे. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. सध्या भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान, शिक्षणक्षेत्र, व्यापार तसेच शासनव्यवस्था या बाबींमध्ये अनेक बदल घडून येत आहेत. विशेषत: ग्रामीण भागांमधील बदल लक्षात घेतल्यास तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे दिसून येतील. तरुणांनी स्वत:च्या विचारांमधील नकारात्मकता काढून टाकल्यास त्यांना या संधींची जाणीव होईल. व्यवसायासाठी कोठेही जाऊन काम करण्याची मानसिकता हवी. तसेच, कामामध्ये धोका पत्करण्याचे धैर्य हवे. जिथे जाल त्या ठिकाणची भाषा संस्कृती शिकून घेतली पाहिजे. आपल्या प्रगतीमुळे आई-वडिलांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसणार आहे त्याचा विचार करा.

## भरपूर वाचा, प्रगती साधा

*वाचनाने आयुष्याची समज वाढते. त्यामुळे भरपूर वाचन करा. जगामध्ये जे चांगले बदल घडत आहेत. त्यांचा स्वीकार करा व नकारात्मकता काढून टाका. सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी वाचन तुम्हाला मदत करेल, असा लोखंडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सल्ला दिला.*

डॉ. गुरव म्हणाले, विद्यार्थी हे संकल्पनांचे विक्रेते झाले पाहिजेत. त्यांनी प्रगल्भतेने विचार करायला शिकले पाहिजे. नियमितपणे वाचन, सकारात्मक विचार हे यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. पाटील यांनी केले. यावेळी विविध अधिविभागातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# सामाजिक विकासाला अग्रक्रम देणारी सहकार चळवळ : देशमुख

कोल्हापूर : प्रतिनिधी

सहकारी चळवळ ही विकास साध्य करणारी आणि सामाजिक विकासाला आग्रक्रम देणारी आहे. सहकारी चळवळ माणसाच्या माणुसकीला आणि नैतिकतेला आवाहन करणारी, भारतीय परंपरेला धरून चालणारी व्यापक चळवळ आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील व्याख्यानमालेंतर्गत माजी सनदी अधिकारी देशमुख यांचे 'सहकारी चळवळीचे भवितव्य' या विषयावर बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

देशमुख म्हणाले, माणसांमधील संघर्ष वाढला तर मानवी जीवनमान उच्च होऊ शकत नाही. म्हणून, माणसांनी एकमेकांना धरून राहिले पाहिजे, हाच सहकाराचा मूळ गाभा आहे. स्वखुशीची एकजूट हा सहकाराचा मूलमंत्र आहे. ही एकमेकांना मदत करणारी सहकारी चळवळ आहे. सहकारी चळवळीचा पाया हा नैतिकतेवर आधारित असला पाहिजे. २०१४ मध्ये कोल्हापूरमध्ये या चळवळीचा शतकमहोत्सव साजरा झाला. सहकारी चळवळीच्या माध्यमातून गुजरातच्या अमूलने देशामध्ये फार मोठी प्रगती साध्य केली आहे. समूह विकासासाठी सहकारी चळवळ महत्त्वाची आहे. सहकारामध्ये, पैशाचे मूल्य वाढत गेले आणि माणसाचे मूल्य कमी होत गेले असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. सहकारामध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होत गेला. गेल्या दहा वर्षांमध्ये ३५ सहकारी साखर कारखाने विकले गेले. सहकारामध्ये राजकारण शिरले आणि त्यानंतर ते भ्रष्टाचाराचे केंद्र बनले. त्यामुळे निम्मे कारखाने बंद पडले. अशा वेळेस खासगीकरण उदयास आले. राज्याने सहकार चळवळीच्या माध्यमातून खूप मोठी प्रगती साधलेली आहे. आता तीच बदनाम झालेली आहे. राज्यातील सहकाराची अवस्था वेळीच सुधारली पाहिजे.

यावेळी डॉ. शिर्के, बी.डी. पाटील यांनीही सहकारी चळवळीबाबत विचार मांडले. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी तर आभार एस. टी. कोंबडे यांनी मानले. यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 MAR 2018
लोकमत

# सहकाराची अवस्था वेळीच सुधारली पाहिजे

## लक्ष्मीकांत देशमुख : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : राज्याने सहकार चळवळीच्या माध्यमातून खूप मोठी प्रगती साधलेली आहे. आता तीच बदनाम झालेली आहे. राज्यातील सहकाराची अवस्था वेळीच सुधारली पाहिजे, असे प्रतिपादन माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील व्याख्यानमालेमध्ये देशमुख बोलत होते. 'सहकारी चळवळीचे भवितव्य' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित व्याख्यानमालेमध्ये माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी विचार मांडले. यावेळी एस. टी. कोंबडे, डी. टी. शिर्के, पी. एस. कांबळे, आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, सहकारी चळवळ ही विकास साध्य करणारी आणि सामाजिक विकासाला अग्रक्रम देणारी आहे. माणसांमधील संघर्ष वाढला, तर माणसांचा जीवनक्रम उच्च होऊ शकत नाही. म्हणून माणसांनी एकमेकांना धरून राहिले पाहिजे, हाच सहकाराचा मूळ गाभा आहे. सहकारी चळवळीने ग्रामीण विकासाला खूप मोठी चालना दिलेली आहे. सहकाराबाबत पंचवीस वर्षे जे आर्थिक धोरण स्वीकारले आहे, त्याचा हा परिपाक आहे. सर्व व्यवस्थेमध्ये सहकाराचे एक महत्त्वाचे स्थान आहे. मधल्या काळात बदलते जग असले तरी सहकारी चळवळ टिकून राहिलेली आहे. या कार्यक्रमात शंकरराव मोहिते-पाटील यांच्यासमवेत कार्य केलेले बी. डी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.

### तरुण पिढीची जबाबदारी

जे सगळे होते ते माझ्यासाठी आणि मी जे करतो तेही माझ्यासाठीच यामुळे सहकारी चळवळीला उतार लागला आहे. तरीही काही सहकारी संस्था चांगले काम करीत आहेत. सहकारी चळवळ चांगल्या पद्धतीने चालण्यासाठी आजच्या विद्यार्थ्यांची आणि तरुण पिढीचीही महत्त्वाची जबाबदारी आहे, असे प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
6 MAR 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकार चळवळ राजकारणविरहीत असावी

## माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सरकारचा हस्तक्षेप किंवा सहकार्य न घेता सहकारी चळवळ पुढे जावू शकते. यासाठी आंध्र प्रदेशमधील लोकांनी प्रयत्न चालू केले आहेत. त्यानुसार सरकारला बाजूला करुन भारतातील ९ राज्यांमध्ये 'म्युच्युअली अँडेड को-ऑपरेटीव्ह सोसायटी' हा कायदा कार्यरत झाला आहे. सहकारामधील राजकारण दूर करुन व्यावसायिक वर्गीकरण आणले पाहिजे. सहकार चळवळ सबसिडी आणि राजकारण विरहीत झाली तर प्रगतीचा आलेख उंचावेल, असा विश्वास माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व्याख्यानमालेअंतर्गत 'सहकारी चळवळीचे भवितव्य' या विषयावर ते बोलत होते.



विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहामध्ये व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर उपस्थित होते.

यावेळी देशमुख म्हणाले, जागतिकीकरण, उदात्तीकरण, खासगीकरण यांचा स्वीकार केल्यानंतर सहकारी चळवळीचे महत्त्व कमी होईल की काय असा प्रश्न होता. १९५० ते १९७० या कालावधीत मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी चळवळ जोमाने वाढली. अलीकडच्या काळात राज्यकर्त्यांमुळे, बाजाराची अर्थव्यवस्था अत्यंत बिकट झाली आहे. त्यामुळे याकडे सरकारने विशेष लक्ष दिले पाहिजे. खाजगीक्षेत्राप्रमाणे अमर्याद नफा कमावणारे न होता सहकार चळवळ संपूर्ण देशाने स्वीकारली पाहिजे, त्यासाठी धोरण आखले पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये ३५ सहकारी साखर कारखाने विकले गेले. सहकारामध्ये राजकारण शिरले आणि भ्रष्टाचाराचे केंद्र बनले. त्यामुळे निम्मे कारखाने बंद पडले. अशा वेळेस खासगीकरण उदयास आले. खासगीकरणाने सहकाराचे तत्व सोडले नाही. सहकारी चळवळीने ग्रामीण विकासाला खुप मोठी चालना दिलेली आहे. आता, तीच बदनाम होताना दिसते, त्यामुळे राज्यातील सहकाराची अवस्था वेळीच सुधारली पाहिजे.

प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. प्रा. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले. . याप्रसंगी विविध अधिविभागातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

6 MAR 2018

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकार चळवळ आता झाली बदनाम

## लक्ष्मीकांत देशमुख : विद्यापीठात शंकरराव मोहिते-पाटील व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. ५ : ग्रामीण विकासाला चालना देणारी सहकार चळवळ आता बदनाम झाली आहे, असे मत माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी आज येथे केले. सहकार चळवळ ही विकासाला अग्रक्रम देणारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील व्याख्यानमालेत ते 'सहकारी चळवळीचे भवितव्य' विषयावर बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यानमाला झाली.



कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख.

श्री. देशमुख म्हणाले, "भारतीय परंपरेला धरून चालणारी सहकार चळवळ ही व्यापक चळवळ आहे. ती नैतिकतेला धरून असून, माणसांनी एकमेकांना सहकार्य करावे, हा तिचा गाभा आहे. गेल्या दहा वर्षांत ३५ सहकारी साखर कारखाने विकले गेले. सहकारात राजकारण शिरल्याने ते भ्रष्टाचाराचे केंद्र बनले. त्यामुळे निम्मे कारखाने बंद पडले. खरे तर राज्याने सहकार चळवळीच्या माध्यमातून खूप मोठी प्रगती साधली आहे. मात्र, आता सहकाराची अवस्था सुधारण्याची वेळ आली आहे." सहकार चळवळीची सुरवात इंग्लंडमध्ये झाली असून, लोकशाही चळवळीची ती सुरवात होती. सावकारांपासून सुटका व्हावी म्हणून इंग्रजांनी १९०४ मध्ये सहकारी पतसंस्था कायदा सहमत केला. शेतकऱ्यांना नियमित पतपुरवठा करण्यासाठी एक संस्था उभी करण्याचा विचार म्हणजेच ही चळवळ होती, असेही त्यांनी सांगितले. या वेळी बी. डी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.

### सबसिडी, राजकारण बंद व्हावे

सरकारचा हस्तक्षेप किंवा सहकार्य न घेता ही चळवळ पुढे जाऊ शकते. त्यासाठी आंध्र प्रदेशातील लोकांनी सुरू केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करण्याची गरज आहे. सरकारला बाजूला करून भारतातील नऊ राज्यांत म्युच्युअली एडेड को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट कार्यरत झाला आहे. सहकारातील राजकारण दूर होऊन व्यावसायिक वर्गीकरण आणले पाहिजे. यासाठी खूप परिश्रमपूर्वक प्रयत्न करायला हवेत. तसेच, सबसिडी व राजकारण बंद केले तर सहकार चळवळ चांगली चालेल, असेही श्री. देशमुख यांनी सांगितले.

16 MAR 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चांगले बदल स्वीकारा, नकारात्मकता काढून टाका

## प्रदीप लोखंडे : शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वाचनाने आयुष्याची समज वाढेल; म्हणून भरपूर वाचन करा. जगामध्ये जे चांगले बदल घडत आहेत, त्यांचा स्वीकार करा आणि नकारात्मकता काढून टाका, असे आवाहन पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांनी सोमवारी येथे केले.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठात ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांचे व्याख्यान झाले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करियर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल काऊन्सेलिंगतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील व्याख्यानाचा विषय 'चेंजिंग रुरल इंडिया करिअर ऑपॉर्च्युनिटीज फॉर स्टुडंट्स ऑफ हायर एज्युकेशन' असा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे म्हणाले, भारतामध्ये सकारात्मक बदलांसाठी मोठी ताकद आहे. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष भारताकडे लागलेले आहे. सध्या भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान, शिक्षणक्षेत्र, व्यापार तसेच शासन व्यवस्था या बाबींमध्ये अनेक बदल घडून येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागांमधील बदल लक्षात घेतल्यास तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे दिसून येईल. तरुणांनी स्वतःच्या विचारांमधील नकारात्मकता काढून टाकल्यास त्यांना या संधींची जाणीव होईल. आई-वडिलांनी आपल्यासाठी केलेले कष्ट लक्षात ठेवा. आपल्या प्रगतीमुळे आई-वडिलांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसणार आहे, त्याचा विचार करा. मी, वाई तालुक्यातील एका खेड्यात वाढलो. अत्यंत गरिबीत शिक्षण घेऊन आज जगातील २९ देशांमध्ये फिरुन मी कार्य करीत आहे. भारतातील विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग आशादायक आहे. महिला त्यांच्या सामर्थ्याने देशामध्ये बदल घडवू शकतात. कार्यक्रमात केंद्राच्या समन्वयक डॉ. जी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

6 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विचारांमधील नकारात्मकता काढून टाका : प्रदीप लोखंडे



व्याख्यानात बोलताना लोखंडे.

कोल्हापूर, ता. ५ : तरुणांनी स्वत:च्या विचारांमधील नकारात्मकता काढून टाकल्यास त्यांना व्यवसायाच्या संधींची जाणीव होईल, असे प्रतिपादन पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल काऊन्सेलिंगतर्फे आयोजित 'चेंजिंग रूरल इंडिया करिअर अपॉर्च्युनिटीज फॉर स्टुडंटस् ऑफ हायर एज्युकेशन' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. वाणिज्य अधिविभाग प्रमुख डॉ. ए. एम. गुरव अध्यक्षस्थानी होते.

श्री. लोखंडे म्हणाले, "देशात सकारात्मक बदलांची ताकद असून, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण क्षेत्र, व्यापार व शासन यंत्रणेत बदल घडून येत आहेत. ग्रामीण भागातील बदल लक्षात घेतल्यास तेथील तरुणांनाही रोजगार उपलब्ध होत आहे. कामात धोका पत्करण्याची तयारी ठेवून कोठेही काम करण्याची तयारी तरुणांकडे असायला हवी. तसेच त्यांनी वाचनावर भर दिल्यास व्यापक दृष्टी त्यांच्यात निर्माण होईल. त्यामुळे स्वत:च्या विकासाबरोबर समाजाच्या विकासाचाही विचार करण्यास प्रवृत्त होतील." ते म्हणाले, "स्वत:चा विकास साधताना तरुणांनी त्यांच्या आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवावी. विशेष म्हणजे आता विविध क्षेत्रांत महिलांचा सहभाग वाढत असून, त्यांच्या सकारात्मक ऊर्जेचा देशाच्या विकासासाठी नक्कीच फायदा होत आहे." डॉ. जी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

6 MAR 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजच वंचितांचे मसीहा

## – डॉ. एस. टी. बागलकोटी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. एस. टी. बागलकोटी. सोबत डॉ. व्ही.बी. ककडे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. डी. सी. तळुले.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
स्वतःला शेतकरी, कामगार आणि सैनिक यांच्यातीलच एक समजणारे छत्रपती शाहू महाराज हे खऱ्याअर्थाने वंचित, शोषित, गोरगरीबांचे मसीहा होते, असे प्रतिपादन धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे 'छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व धोरण यांचे समकालीन औचित्य' या विषयावर दोनदिवसीय चर्चासत्रात बोलत होते.

डॉ. बागलकोटी म्हणाले, समाजामध्ये समानता, सामाजिक न्याय आणि वैश्विक बंधुत्वाची भावना प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र झटणारे राजर्षी शाहू महाराज यांची अंगीकृत कार्याप्रति पराकोटीची निष्ठा होती. ब्राह्मणी वर्चस्ववादावर प्रहार करीत असतानाच ब्राह्मणेतर समाजामध्ये आत्मोन्नतीची भावना चेतविण्याचे महत्कार्य त्यांनी केले. भेदभाव न करण्याचे रयतेला आदेश देत असताना जातवर्चस्वाच्या भावनेपासून खालच्या वर्गांची मुक्तता करणे ही ब्रिटिशांपासून मुक्तता मिळविण्याइतकाच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे, असे त्यांचे मत होते.

डॉ. बागलकोटी म्हणाले, शाहू महाराज हे उच्चकोटीचे कृतिशील अर्थतज्ज्ञ होते. शाहू महाराजांनी शेती, सिंचन, पायाभूत सुविधा विकास, रस्ते विकास, पणन-विपणन, लघू व मध्यम उद्योगांचा विकास आदी अनेक क्षेत्रांचा साकल्याने विचार व विकास केला. त्यामध्ये लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न केले. उर्ध्वगामी प्रशासनाच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या चरित्रापासून कृतिशीलता, अंगीकृत कार्याप्रति निष्ठा आणि समर्पण या गुणांचा आदर्श आजच्या राज्यकर्त्यांनी घेण्याची गरज आहे. सहभागात्मक विकास, संसाधनांचे समन्यायी वाटप, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा विकासावर भरीव व नेमका खर्च, शेतीच्या वृद्धीला मदत, सामाजिक-आर्थिक विकासासाठी प्रयत्न, अंधश्रद्धा निर्मूलन आणि विद्वानांचा योग्य आदर या बाबी करण्यासाठी शाहू चरित्रापासून प्रेरणा घेण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, लोकशाहीत धोरण निर्धारित करणाऱ्या संस्था जेव्हा निष्क्रिय होतात, तेव्हा स्वातंत्र्याला, सामाजिक न्याय प्रस्थापनेला मर्यादा पडतात. समावेशी विकासाला अडथळा करतात. नव्वदोत्तरी कालखंडात देशात मोठ्या प्रमाणात असमानता वाढू लागली. सामाजिक-आर्थिक दरी वाढू लागली. ही असमानता दूर करण्यासाठी हिरिरीने प्रयत्न करण्याची गरज आहे. जी व्यवस्था प्रत्येकाला रोजगार देऊ शकते ती खऱ्याअर्थाने समावेशी स्वरुपाची असते, याची जाणीव ठेवून काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. एम. एस. देशमुख यांनी आभार मानले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. डी. सी. तळुले, डॉ. आर.जी. दंडगे, डॉ. एस. टी. कोंबडे, डॉ. एस. पी. पंचगल्ले यांच्यासह संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, शाहूप्रेमी नागरिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
6 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# होस्टेल म्हणजे हक्काचे घर

महेश कांबळे
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ

महाविद्यालयीन जीवनामध्ये स्पेशली मुलींसाठी होस्टेल ही जागा कायमच संस्मरणीय असते, त्यांच्यासाठी ते वेगळेच जग, जिथे मुली एकत्र राहतात, मौज- मजा, मस्ती, आठवणी शेअर करतात, फावल्या वेळेत पटापट मेकअप करणे मात्र कुठे फिरायला जाण्यासाठी नव्हे तर फक्त एक सेल्फी काढण्यासाठी हा सध्याचा नवा ट्रेंड. शिवाजी विद्यापीठामध्येही असेच एक मुलींचे होस्टेल आपले वेगळेपण टिकवून आहे, बाहेरून तुरुंगासारखे बंदिस्त भासणारे हे होस्टेल मात्र देशाच्या विविध भागातून, प्रांतातून शिक्षणासाठी, नोकरीनिमित्त आलेल्या मुलींचे हक्काचे घरच असते.

विद्यापीठाच्या नैसर्गिक वातावरणामध्ये शिस्त आणि व्यवस्थापनाचा उत्तम नमुना म्हणूनही या होस्टेलची ओळख आहे. महाविद्यालयीन जीवनामध्ये पदवीनंतर वेगळ्या वाटा तुडवताना नव्या विश्वाची चाहूल लागते, शिक्षणासाठी बाहेर राहणे मुलींना नित्याचेच, अगदी लहानपणापासून लाडात वाढलेल्या या 'लेकी' स्पर्धेच्या युगात मात्र स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करत असतात. घरी स्वातंत्र्याचा होणारा संकुचितपणा, व हॉस्टेल लाइफमधील स्वतंत्र, छंद जोपासण्यासाठी मिळणार वेळ, कॉलेजचे लेक्टरस, सबमिस्टशन्समधून येणाऱ्या सुट्या तर पर्वणीच ठरतात, या सुट्यामध्ये संपूर्ण रात्र जागून सिनेमा पहाणे, एकमेकींचे अफेयर्स क्रश, लव्ह- लाइफ, लग्नाच्या गप्पा तसेच सामाजिक विचारांवर आपली मते बिनधास्त व्यक्त केली जातात. या सर्व आठवणींचे क्षण कोणी आपल्या मोबाइलमध्ये कैद करते तर कोणी लॅपटॉपवर, पुढील जीवनात आठवणींचे हेच प्रसंग पुन्हा जगण्यासाठीच ही धडपड. होस्टेलवर साजरे होणारे मार्च महिन्यातील 'हॉस्टेल डे' हा प्रत्येक मुलीचा हक्काचा दिवस, या दिवसाची प्रतीक्षा सर्वनाच लागलेली असते.

होस्टेल प्रशासनाकडून सूचना मिळताच सुरू होते या वैशिष्टपूर्ण दिवसाची तयारी, मुलींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते, प्रत्येक जिल्ह्यामधून एकत्र आलेल्या प्रत्येक मुलींच्या अंगी असणाऱ्या ॲक्टिव्हिटी येथे सादर करण्याला कोणतेही बंधन नसते, फॅशन शो, डान्स स्पर्धा, निबंधमाला, हेअर स्टाइल सोबतच लेक वाचावा, बेटी बचाओ, बेटी पढाओ सारख्या सामाजिक विषयावरही प्रात्यक्षिके साजरी करण्याला कॉलेजिअन्स गर्ल्सचे प्राधान्य असते. सांस्कृतिक कार्यक्रमासह सावित्रीबाई फुले यांची जयंती, फ्रेशसर्स डे, ज्येष्ठ महिला विचारवंतांचे परिसंवाद यांचेही आयोजन केले जाते. पॅडमॅन, दंगल असे सामाजिक विषयावर भाष्य करणारे चित्रपट ही दाखवले जातात. घरच्यापासून लांब असल्याने आपुलकी चे नाते व विचारांची बैठक पक्की करण्यासाठी काहींनी वाचण्याचा छंद जोपासला आहे, महाविद्यालयीन जीवनामध्ये येणारे चढ-उतार, याचबरोबर मित्र-मैत्रिणीच्या सोबत घालवलेले दिवस प्रत्येक युवतीसाठी खास असतातच पण जीवनाच्या व होस्टेलवरील घालवलेल्या प्रत्येक क्षणाचा पुरेपूर आनंद घेण्याचा हा प्रयत्न असतो.

जगाच्या पाठीवर कोणत्याही होस्टेलमध्ये असलं तरी घरापासून दूर राहून अनुभवलेले हे विश्व खूप विविध रंगी असते, नव्या मित्र-मैत्रिणीचं तयार झालेलं नवं कुटुंब, खाण्या-पिण्याच्या बदलेल्या किंवा बदलाव्या लागलेल्या सवयी, तासाला बंक मारून केलेली मौज-मस्ती, संकटात कुटुंबीयाआधी धावून येणारे जिगरबाज दोस्त, सगळं काही आगळ-वेगळं. म्हणूनच या दिवसांच्या आठवणींचा ठेवा सर्वांनाच हवा-हवासा वाटतो.

**यशापर्यंत पोहचण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न, जीवनामध्ये प्रत्येक गोष्टीला छोटेखानी योजना असते. विद्यापीठातील हॉस्टेल, वैचारिक देवाण-घेवाण, संवाद वाढल्याने नवा आत्मविश्वास मिळतो. होस्टेलचे विश्व आयुष्यभर लक्षात राहणारे असते.**

**- प्रियांका जगटे**

**होस्टेलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमामधून मार्गदर्शन होते, वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटी करण्याची संधी मिळते, वैचारिक पातळी वाढते, एकांतामध्ये स्वतःचा शोध घेण्याची संधी मिळते. होस्टेलचे दिवस पुन्हा कधीच न येणारे असतात म्हणून एन्जॉय करते.**

**- प्राजक्ता मादनाईक**

-6 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनाला पटेल तेच करिअर निवडा!

## राज कांबळे, आकाश डोंगरे यांनी दिली ऊर्जा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : "आपल्या मनाला पटेल त्याच क्षेत्रात करिअर निवडा... कुठल्याही बंधनात न अडकता आपण जे काही करतो ते मग सर्वोत्कृष्टच होते... कितीही मोठ्या कंपनीत मोठ्या पगारावर काम करीत असला तरी काही विशिष्ट मर्यादेच्या पुढे जाऊन काम करता येत नाही... योग्य वेळी निर्णय घ्या आणि स्वतःचा छोटासा का असेना, व्यवसाय सुरू करा..." अशी सळसळती ऊर्जा आज आंतरराष्ट्रीय जाहिरातकार राज कांबळे आणि 'इंडस ओएस'चे जनक आकाश डोंगरे यांनी दिली. निमित्त होते सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमांतर्गत तिसऱ्या पुष्पाचे. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्राने तिसऱ्या दिवशीही कोल्हापूरकरांची उत्स्फूर्त हजेरी अनुभवली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मार्व्हलस इंजिनिअर्सचे गौरव पाटील यांच्या हस्ते

पान ८ वर »

### राज व आकाश सांगतात...

- वेडेपणा असावाच. त्याशिवाय झपाटून आणि मनाला पाहिजे तसे शक्यच नाही.
- नोकरी सोडून व्यवसायात येण्याचा निर्णय योग्य वेळी घ्यायलाच हवा.
- भाषांची अडचण असली तरी त्याला सामोरे गेले की त्यावरही मात करता येते.
- दुसऱ्यांचे प्रॉब्लेम सोडवल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मोठे समाधान देतो.
- संतुष्ट होऊ नका. रिस्क घ्यायला शिका, त्यातून यशस्वी होण्याचा मार्ग अधिक सुंदर असतो.
- कोल्हापूरला गूळ आणि चप्पलचे ब्रँडिंग करून व्यवसायाची मोठी संधी.
- २०१९ ची निवडणूक 'गाफा' गाजवणार. अर्थात जी फॉर गुगल, ए फॉर ॲप्पल, एफ फॉर फेसबुक आणि ए फॉर ॲमेझॉन.



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' उपक्रमात सोमवारी बोलताना 'इंडस ओएस'चे जनक आकाश डोंगरे आणि आंतरराष्ट्रीय जाहिरातकार राज कांबळे. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

- सोशल मीडिया कितीही विस्तारला तरी मुद्रित माध्यमांना धोका नाही. कारण गेल्या वर्षभरात मुद्रित माध्यमांचा विस्तार ४९ टक्के इतका झाला आहे.

पान ८ वर »



### आज सांगता

साताऱ्याचे कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक संदीप पाटील आणि पायलट व विमाननिर्मितीतील युवा मराठी, उद्योजक अमोल यादव यांच्याशी आज (मंगळवारी) संवाद होईल. श्री. पाटील यांनी नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनासाठी केलेले काम आणि श्री. यादव यांचे 'मेक इन इंडिया'चं स्वप्न त्यातून उलगडणार आहे. या संवादांनी उपक्रमाची सांगता होणार असून फेसबुकवरून लाईव्ह प्रसारण होणार आहे. हा संवाद अनुभवण्यासाठी लिंक करा-www.facebook.com/kolhapursakal

6 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनाला पटेल तेच करिअर निवडा!

» पान १ वरून

श्री. कांबळे व श्री. डोंगरे यांचे स्वागत झाले. मिलिंद कुलकर्णी (पुणे) यांनी हा संवाद अधिक खुलवला.

राज कांबळे यांचा जन्म मिरज तालुक्यातील आरग गावचा. त्यांच्या जन्माचीही कथा रंजक आहे आणि म्हणूनच याच मातीतून सर्जनशीलतेची बीजं मनात रोवली गेल्याचे सांगून त्यांनी आपला प्रवास उलगडला. ते म्हणाले, ''आजी लहानपणी गोष्टी सांगायची. ती ऐकूनच मोठे होत असताना आपणही भविष्यात चांगले 'स्टोरीटेलर' व्हायचे, हा निर्धार केला. पुढे मुंबईत लहानाचा मोठा झालो. 'आयआयटी'मध्ये प्रवेशही मिळाला. पण त्यात मन रमले नाही आणि म्हणूनच जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌ला ॲडमिशन घेतले. कॉलेज करत एका वृत्तपत्रात रात्री उपसंपादक म्हणून नोकरीही केली. पण एक आर्टिकल लिहिल्यानंतर वरिष्ठांशी वाद झाला आणि नोकरी सोडली.''

अभिजात चित्रकलेचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'लिंटास' कंपनी जॉईन केली आणि मग विविध जाहिराती सुरू झाल्या. अगदी ऑफिसमधील एका मुलाला सचिन तेंडुलकरचा डमी उभारून केलेली जाहिरात असो किंवा 'यलो पेजीस'ची जाहिरात, या जाहिरातींना मानाचे पुरस्कार मिळाले आणि कंपनीने मुख्य ऑफिसला लंडनला प्रमोशन केले. लंडन पुढे न्यूयॉर्क असा प्रवास सुरू होता. अगदी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत बराक ओबामा यांच्यासाठीही प्रमोशनचे काम केले. पण चार वर्षांपूर्वी पुन्हा भारतात आलो आणि मुंबईत स्वतःची फेमस इनोव्हेशन कंपनी स्थापन केली आणि अनेक ब्रँड नावारूपाला आणत त्यांची व्यवसाय वृद्धी केल्याचेही त्यांनी सांगितले. त्यांनी केलेल्या विविध जाहिरातींची झलकही यावेळी पाहायला मिळाली. आकाश डोंगरे सॉफ्टवेअर क्षेत्रातील तंत्रज्ञ. आपल्या दोन मित्रांसह नोकरी सोडून त्यांनी 'स्टार्ट अप' छोटा व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार केला. मोबाईल पेमेंटचा विषय आत्ता चर्चेत असला तरी दहा वर्षांपूर्वी त्यांनी मोबाईल पेमेंट डिव्हाईस बनवण्याचा प्रयत्न पहिल्यांदा केला. २००७-०८ या दरम्यान अमेरिकेत स्मार्टफोन आले आणि त्याच वेळी मोबाईल ॲपची निर्मिती सुरू केली आणि कंपनीचा व्यवसाय हळूहळू वाढू लागला. पुढे 'इंडस ओएस' ही भारतातील पहिली ऑपरेटींग सिस्टीम सुरू केली आणि आज त्याचे एक कोटीहून अधिक युजर्स आहेत. इंग्रजीशिवाय विविध भारतीय प्रादेशिक भाषांत मोबाईलधारकांना विविध सुविधा दिल्या जात आहेत आणि म्हणूनच कंपनीचा विस्तार गतीने वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

## शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत मुलाखती होतील. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था केली आहे. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून मोफत सन्मानिकाही उपलब्ध आहेत.

## प्रायोजकांविषयी...

- सहप्रायोजक : चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स,
- अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी

## राज व आकाश सांगतात...

» पान १ वरून

**बाथ आणि शॉवर..!**

राज कांबळे यांनी एक रंजक अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''एका परदेशी मित्रांबरोबर बोलताना मी रोज बाथ घेतो, असे सांगायचो. त्यामुळे तो हसायचा आणि मी महिन्यातून एकदा बाथ घेतो, असे त्यांना सांगायचा. राज यांना महिन्यातून एकदाच बाथ घेणाऱ्या या मित्राचे हसू यायचे. एक दिवशी त्यांनी ठरवून त्या मित्राला विचारलेच आणि त्यातून या रंजक किश्श्यातील क्लायमॅक्स उलगडला. रोजच्या अंघोळीला राज 'बाथ' म्हणायचे आणि परदेशात त्याला 'शॉवर' म्हणतात. परदेशात 'बाथ' या शब्दाला शाही स्नान म्हणून संबोधतात.''